# चित्रव्यूहप्रवेश



*विषयांतर हा माझ्या योजनेचा भाग आहे.*
हिरोडटस (ख्रिस्तपूर्व ४८४-४२५), ग्रीस

विविध आकारांच्या, लांबीरुंदीच्या आणि वक्रतांच्या आरशांचे तुकडे एकमेकांशी वेगवेगळे कोन करून एका बोटीच्या डेकवर ठेवलेत. त्यांच्याकडे पाहणारा एका कॅबीनमध्ये दारापासून दूरवर आत बसलेला आहे. दाराच्या अरुंद चौकटीमुळं त्याला बाहेरच्या परिसराचं दृश्य प्रत्यक्ष बघता येत नाही. आरसे त्याची वाट अडवतात. त्याला आरशात जे दिसतं, तितकंच बघता येतं. फक्त विखुरलेली प्रतिबिंबं.

ह्या कॅबीनमधल्या व्यक्तीला कधी सूर्य एखाद्या फुगीर आरशात अंडाकृती स्वरूपात दिसतो. कधी सरळ ढगांच्या कमानी झालेल्या दिसतात. कधी वारा भरलेलं शीड तंबूसारखं दिसतं. झेपावणारे सागरपक्षी जेव्हा आरशांजवळून जातात, तेव्हा त्यांची प्रतिबिंबं महाकाय गरुडांच्या धुडांसारखी भासतात. कधी गिरणगावातल्या चिमण्या आणि त्यांचा आकाशाला काळं करणारा धूर दिसतो. सिनेमाच्या भिंतीएवढाल्या जाहिराती दिसतात. कधी महाकाय इमारती, पर्वतप्राय क्रेन्स, अगडबंब जहाजं आणि रॉकेट्सची लाँचिंग

पॅड्स दिसतात. लेझर प्रकाशोत्सव दिसतात. कधी नदीच्या घाटावरची प्रशांत देवळं दिसतात.

रात्री आरशांमध्ये प्रतिबिंबित तारे दिसतात. चंद्राच्या कला दिसतात. आकाशस्थ ग्रह-नक्षत्रांची परस्परांतली अंतरं ह्या आरशांच्या एकमेकांशी होणाऱ्या कोनांमुळे आणि वक्रतेमुळं बदललेली असतात. मधेच आरसे धुऊन टाकणाऱ्या लाटेनं त्या सर्व आरशांतली प्रतिबिंबं पुसली जातात. परत उमटताना त्यांच्या कडा स्निग्ध होतात. कंगोरे नष्ट होतात. हलके तरंग स्थिर होता होता ती परत उमलू लागतात.



हरेक प्रतिबिंब एका वेगळ्या कोनातून, एका वेगळ्या मापाचं जग दाखवतं. त्यामुळे समग्र, एकसंध चित्र हाताला लागत नाही. ह्यात कॅबीनमधल्या माणसाला चकवण्याचा आरशांचा हेतू नसतो. त्यांचा जीव आणि कल जितका आहे, त्यापलीकडे ते आणखी काही देऊ शकत नाहीत. प्रत्येक प्रतिबिंब हे अंशचित्र किंवा अंशबिंब असतं, पण आपल्या परीनं पूर्णही असतं.

ह्या चित्रांचा मिळून एक व्यूह होतो, तो चित्रव्यूह. पाहणाऱ्याला हे तुकडे मनात जोडून जर पूर्णबिंबाची कल्पना करता आली, तर तो हा व्यूह छेदतो. पण इथे आव्हान नाही. एखादंच अंशबिंब न्याहाळावंसं वाटलं, तरीही काही बिघडत नाही. त्यातही पूर्णबिंबाची सूचना असते.

पूर्णबिंबदेखील गोठलेलं एकच एक बिंब नसतं. अनुभवाच्या नव्या सशक्त लाटेबरोबर ते विखुरलं जातं. मग पुढची लाट येण्यापूर्वीच्या शांततेत ते नव्यानं जन्माला येतं. स्थिरावतं. त्याच्या पूर्णत्वानं पाहणारा मोहून जातो-न जातो तेवढ्यात नवीन लाटेनं ते परत छिन्न होतं.

चित्रव्यूह हा अशा अंशचित्रांचा संग्रह आहे. ती कधी व्यक्तींची आहेत, कधी प्रसंगांची, तर कधी क्षणांची. ही अंशचित्रं मला आयुष्याच्या वेगवेगळ्या कालांत, चैतन्यानं भरलेल्या विविध अनुभवांत जाणवत गेली. ती कुठल्याही आधीच तयार असलेल्या अमूर्त कल्पनेतून निर्माण झालेली नाहीत. त्यांच्यामागे कोणताही इझम नाही. व्यक्त आणि सुस्पष्ट तत्त्वज्ञान नाही. एखादं चित्र क्षणचित्र आहे, दुसरं चिरचित्र आहे, तर तिसरं प्रवाही चलच्चित्र आहे. क्षणचित्रं क्षणभर लखलखणाऱ्या आणि अंधारात गडप होणाऱ्या विद्युल्लेखेसारखी असतात. चिरचित्रं मध्यान्हीच्या सूर्यात दिसणाऱ्या जगाची असतात. सूर्य एकदा माथ्यावर आला, की साऱ्या भावनिक आणि वैचारिक सावल्या अगदी लहान होऊन मांजरासारख्या पायाभोवती घोटाळतात. त्यात वृंदावनी सारंगात प्रतीत होणारा, दूरपर्यंत गोचर होणारा, तरंगविहीन विस्तीर्ण सागर किंवा मरुप्रदेश जाणवतो. ती चित्रं पाहताना एरवी 'चपलचरण असणाऱ्या अनिलगणां'चा वालुकणांवरून किंवा पाण्यावरून जाताना होणारा अस्पष्ट मर्मरव जेमतेम ऐकू येतोसा वाटतो.

कधी एखाद्या अंशचित्रातल्या खिन्न प्रकाशात भेडसावणाऱ्या लांबलचक सावल्या ह्या देवांच्या हळूहळू रक्तहीन, तेजोहीन आणि प्रकाशहीन होत जाणाऱ्या अस्तित्वाचे यमदूत होतात. कधी रात्री बोटीला लाटांचे जबरदस्त तडाखे बसू लागले, की ह्या आरशातल्या प्रतिबिंबांची 'अप्रच्छन्न प्रतिबोंब' होते आणि जगच कोलमडणारसं वाटतं.

आरशांच्या ह्या गलबताला एका विशिष्ट जागी पोहचायचं आहे असं नाही. कुठं किती थांबायचं, त्याचा आधी मांडलेला हिशेब नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची घाई नाही. पण जग पाहण्याची

उत्सुकता आहे. 'कुठं जायचंय'पेक्षा 'कसं जातोय, वाटेत काय दिसतंय' ह्यातच अधिक रस आहे.

'चित्रव्यूह' ह्या लेखसंग्रहात दृश्यचित्रांबरोबर ध्वनिचित्रंही आहेत. ध्वनीची जाणीव गर्भाशयातच येते. दृष्टीसारखं तिला जन्मापर्यंत थांबावं लागत नाही. दृष्टी कितीही दूरवर पोहचली, तरी शेवटी पाठीला डोळे नसतात. कान सर्व बाजूंनी येणारे आवाज ऐकतात. इतकेच नव्हे तर दृष्टीच्या तुलनेने त्यांनी ग्रहण केलेले नाद आणि ध्वनी शरीरात अधिक घुसतात. घुमतात. धीरगंभीर वाद्यांचे नाद हृदयाला आणि आतड्यांना थरथरवत ठेवतात. अनेक ध्वनिचित्रं स्मृतीत खोदलेल्या शिल्पांसारखी किंवा गुहाचित्रांसारखी दीर्घायुषी असतात. दिसणाऱ्या ध्वनिउगमांबरोबर न दिसणाऱ्या ध्वनिउगमांनाही कान ग्रहण करतात. स्वीकारतात. सर्वांगी श्रवणाचा अनुभव आपल्या कल्पनाशक्तीने एकांगी अशा पुरोदृष्टीला सांभाळून घेतो.

चित्रव्यूहात गंधचित्रंही समाविष्ट आहेत. ध्वनीपेक्षा शरीराच्या निकट येणारी संवेदना म्हणजे गंध. ज्याचा गंध आपल्याला येतो, त्या वस्तूचा प्रत्यक्ष अंशच अगदी सूक्ष्म प्रमाणात आपल्या शरीरात शिरलेला असतो. दृश्य आणि ध्वनी ह्यांच्या अनुभवाचं स्वरूप क्षणिक असतं. जे आपल्याला दिसतं, ते तेव्हा समोर असतंच. जे ऐकू येतं, तेही वर्तमानकाळात असतं. कारण त्याचा प्रतिध्वनी फार लांबू शकत नाही.

पण गंध हा आधीच पोहचतो. ओळखीचं अत्तर आणि सुगंध हे प्रिय व्यक्तीच्या येण्याची सूचना देतात. मृद्‌गंध आल्यावर दूरवर पाऊस पडत असल्याची जाणीव होते. गंध हे अग्रदूत असतात, पण ते स्मृतींसारखे

व्यक्ती निघून गेल्यावरही मागे रेंगाळतात. माळ्यावर पडलेली अत्तराची जुनी रिकामी कुपी अनेक वर्षांनी उघडली; तरी तिच्यातून बाहेर येणाऱ्या गंधरेखांनी रेखलेल्या, जिनप्रमाणे वाढतच राहणाऱ्या स्मृती आपल्या भोवतालचं वातावरण व्यापून टाकतात आणि सहजपणे आपल्याला खांद्यावरून वर्तमानकाळातून भूतकाळात नेतात.

स्पर्शचित्र आपल्या अंगाला अगदी खेटून राहतं. जवळीक साधतं. त्यातला खडबडीतपणा, नितळपणा, तलमपणा आणि ऊब ह्यानं चित्रात जीव भरतो. माणसामाणसांतली जवळीक जशी आलिंगनात व्यक्त होते आणि संभोगात पूर्णत्व शोधते, तसंच इतर अनुभवांचं. स्पर्शचित्र क्षणभंगुर असतं. मात्र ते जर दु:खद असलं, त्यानं पोळलं, भाजलं, कापलं; तर त्याची वेदना बराच काळ राहते. सुख कापरासारखं उडून जातं.

दृष्टीला जे पडतं, कानांनी जे ऐकू येतं, जे स्पर्शाने जाणवतं; ते शरीरात प्रवेश करत नाही. रसनाचित्र हे संपूर्णानंदाकरता इतकं महत्त्वाचं आहे, की भरतमुनींनी आपल्या सर्व सौंदर्यव्यवहाराला अलंकारस्वरूपात त्यात सामावलं आहे. बाहेरचं जग आणि शरीर ह्यांचा सर्वात निकटचा व्यवहार होण्याचं स्थळ म्हणजे मुख. खाद्यपदार्थाचा अंश जेव्हा त्यात जातो, आपण त्याचं जसजसं चर्वण करतो, तसतसं अनेक पदरांचं रसनाचित्र आपल्याला जाणवू लागतं. मुखातले रस आणि पदार्थांचे रस इथे एकमेकांना भेटतात आणि आपलेपणानं मिसळतात. शरीराच्या आतल्या आणि बाहेरच्या जगाच्या मीलनाचा हा एक मंडपच आहे. त्यावर जिव्हेचं अनुशासन आहे. तिच्या पसंतीला न पडणाऱ्या जगाच्या अंशाला आपल्या शरीरात सहजासहजी जागा नाही. ते शरीरात रिचत नाही. जे रिचत नाही, ते पचत नाही. जे पचतं, ते शरीरात विलीन होतं. शरीराचा अंश होतं. चित्रव्यूहातील सारी चित्रं ही रसचित्रं व्हावीत, ही इच्छा.

इंद्रियांची अशी विभागणी करून प्रत्येकाला चित्रांचा एकेक प्रदेश वाटून दिल्यानं त्यांचं थोडंच समाधान होतंय? त्यांना दुसऱ्या इंद्रियाच्या अनुभवात सहभाग हवा असतो, ह्याची पुराण्या व्यूहकारांनाही जाणीव आहे. जिभेला कान व्हायचं असतं. कानांना दृष्टी हवी असते. रंगांना ध्वनिलहरींवर तरंगायचं असतं. कोणत्याही अनुभवाची चाहूल लागली, की तो आपलासा करण्याकरता सारी इंद्रियं दबा धरून बसतात. ज्ञानेश्वर म्हणतात,

*आइकां रसालपणाचेया लोभा । किं श्रवणि चि होथि जिभा ।*
*बोलें इंद्रियां लागे कलभा । येकमेका ।।*
(राजवाडे प्रत ६.१६)



म्हणूनच एखादं बेडौल चित्र पाहत असताना त्यातल्या रंगांच्या कोलाहलानं कान किटतात. सुरेल वाद्याच्या नादाला स्पर्शाच्या झालरी असतात. नाद कधी नितळ असतात, तर कधी त्यांच्या शरीरावर रोमांचाची लव असते. रंग शीतोष्ण असतात. तीव्रकोमल असतात.

त्यामुळे चित्रव्यूहातल्या अनुभवांचं ज्ञानेंद्रियांच्या कप्प्यात नेटकं विभाजन होऊ शकत नाही. सर्व इंद्रियांना जागं राहायला लागतं. ज्या इंद्रियाच्या हाती ससा, तो पारधी.

सर्व इंद्रियांच्या अनुभवाच्या मुळाशी लय आहे. लयीशिवाय अनुभव नाही आणि अनुभवाशिवाय लय नाही. प्रत्येक ऐंद्रीय चित्राच्या रंगाखाली लयीच्या नाजूक रेषा दडलेल्या असतात. त्या आपल्या नाडीच्या ठोक्यांचं नियंत्रण करतात. हृदयात धडधड घडवतात. श्वास रोखून धरतात किंवा श्वास-नि:श्वासाच्या बेरीज-वजाबाकीचं ताळेबंद अंकगणित बदलतात. स्पर्शाला अधिक सुखद किंवा असह्य करतात. श्वासाचं वायुवाद्य आणि

हृदयाचं तालवाद्य ह्यातून होणारं सुखसंगीत हे लयचित्र आहे.

अनुभवाला अपेक्षा आकार देते. अपेक्षेला कल्पना आधार देते. कल्पना वर्तमानाच्या डायव्हिंग बोर्डावरून भविष्यात उडी घेते. कधी ती वास्तवात लगेच परत येते. कधी अंतराळात दूर जाते. उडत उडत सावकाश परत येते किंवा तशीच तरंगत राहते. भारविरहित, नियमविरहित जग तयार करते. कार्यकारणाच्या शृंखलांचे बंध हळूच सोडते. चित्रव्यूहात कल्पनाचित्रांना आपलं असं मानाचं स्थान आहे. इटालियनमध्ये एक वाक्प्रचार आहे, *'se non è vero, è ben trovato'*

म्हणजे 'हे खरं नसेना का, पण किती नेटकं जमलंय.'

स्मृतिचित्रं. चित्रांच्या स्रोतांचा उगम स्मृतीत आहे, म्हणून ती स्मृतिचित्रं. प्रत्येकाच्या स्मरणशक्तीनं त्याचं अस्तित्व बांधलेलं असतं. व्यक्तिमत्त्व घडलेलं असतं. स्मृतीवर आपला काही प्रमाणात ताबा असतो. एका विशिष्ट गोष्टीची आपण आठवण करू शकतो. पण भावना स्मृतीचे आकार बदलत असतात. उत्तम कलेचा अनुभव वैयक्तिक स्मृतीपलीकडे जातो. मानवत्वापेक्षा खोल पातळीवर पोहचतो. ज्या स्मृती आपल्या विचारातून निसटलेल्या असतात, त्या शरीरात आणि पेशीत पहुडलेल्या असतात. उत्कट अनुभवाने त्या जागृत होतात. अशा अनुभवाचे झंकार शरीरभर पसरतात.

स्मृतिचित्रांचा उल्लेख करून मला 'चित्रव्यूहा'ची मराठीतल्या एका अत्यंत थोर ग्रंथाबरोबर तुलना करायची नाही. 'स्मृतिचित्रे' ह्या शब्दात मराठी भाषेच्या लक्ष्मी आणि सरस्वती ह्या एकत्र नांदतात. त्यांना एकाच वेळी वंदन करता येतं. त्यांची स्मृती ठेवून 'चित्रव्यूहा'चा श्री गणेशा करतो.

---